07-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/6/2025 10:40 PM Page 1



## निवडक

### राज्यपालांकडून गोव्यातील लोकांना ईद-उल-जुहाच्या शुभेच्छा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ६ :** गोव्याचे राज्यपाल, पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी गोव्यातील लोकांना ईद-उल-जुहा (बकरी-ईद) निमित्त हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.
आपल्या संदेशात राज्यपाल म्हणतात, मी गोव्यातील लोकांना विशेषत: मुस्लिम बांधवांना ईद-उल-जुहाच्या (बकरी ईदच्या) हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो. ईद-उल-जुहा हा सण भारतात आणि संपूर्ण जगात पारंपारिक भावनेने आणि आनंदाने साजरा केला जातो. या सणाला त्यागाचा सण असेही म्हणतात आणि हा सर्वात महत्त्वाचा इस्लामिक सण आहे. हा सण क्षमा आणि दानाचे प्रतिक आहे आणि समाजाच्या सदस्यांमध्ये सलोखा आणि बंधुत्वाची भावना वाढीस लावतो.
या प्रसंगी, मी सर्व धर्माच्या लोकांना शांतता, स्नेहभाव, मैत्री आणि परस्पर सामंजस्याने एकत्र राहण्याचे आवाहन करतो ज्यामुळे आपल्याला अधिक आनंद आणि समृद्धी साध्य करणे शक्य होईल. ईद-उल-जुहा हा सण लोकांमध्ये अधिक शांतता आणि मैत्रीची भावना वाढीस लावो असे राज्यपाल आपल्या संदेशात शेवटी म्हणतात.

-------------------------------

### मुख्यमंत्र्यांकडून गोव्यातील लोकांना ईद-उल-जुहाच्या शुभेच्छा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ६ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी गोव्यातील लोकांना आणि विशेषत: मुस्लिम बांधवांना ईद-उल-जुहा निमित्त हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. आपल्या संदेशात मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत म्हणतात, ईद-उल-जुहा सणामुळे नेहमीच लोकांमध्ये दया, करुणा आणि प्रेम, एकता, शांतता आणि सामाजिक सलोखा या मूल्यांची भावना वाढीस लागते. या आनंदाच्या प्रसंगी या राज्याच्या वाढीसाठी आणि विकासासाठी योगदान देऊन आपल्या समाजाच्या उज्वल भविष्यासाठी आपण एकत्र येऊया, असे मुख्यमंत्री आपल्या संदेशात शेवटी म्हणतात.

-------------------------------

### पाळोळे फिडरवर १० रोजी खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. ६ :** ११ केव्ही पाळोळे फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. १० रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत टेलिफोन एक्सचेंज, क्लियोपात्रा, गायतोंडेवाडा, ढवळीकर हॉस्पिटल, देवबाग, आईस फॅक्टरी, सोबित सरोवर हॉटेल, दया हॉटेल, पाळोळे क्लब, पाळोळे बीच, रिक्षा स्टँड आणि पार्किंग एरिया भूमिपुरुष भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

-------------------------------

### वाळपई भागात वीज तारांबाबत इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**सत्तरी, दि. ६ :** सत्तरी तालुक्यातील ३३/११ केव्ही वाळपई उपकेंद्राच्या ११ केव्ही सालेली फिडरपासून अडवई, भोम पाडेली ते शिंगणे पिसुर्लेपर्यंत ओढण्यात आलेली भूमीगत वीज वाहिन्या आणि त्याच्या संघटित वीज यंत्रणा १२ जून २०२५ रोजी पासून विध्युत भारीत करण्यात येणार असून यापुढेही ती तशीच भारीत राहील. लोकांनी या वरील यंत्र सामुग्रीपासून दूर रहावे त्यांना स्पर्श करू नये अन्यथा जिवीतास धोका आहे.

-------------------------------

### काणकोण सामाजिक आरोग्य केंद्रात आज रक्तदान शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ६ :** पैंगीण, काणकोण येथील ब्लड रिलेशन फाऊंडेशनतर्फे उद्या शनिवार दि.७ जुन रोजी, गोवा मानव संसाधन विकास महामंडळाच्या सहकार्याने काणकोण घ्या सामाजिक आरोग्य केंद्रात सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदात्यानी मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

-------------------------------

### अखिल गोमंतक भंडारी समाज शैक्षणिक व उद्यमी संघाची सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ६ :** पेडणे येथे अखिल गोमंतक भंडारी समाज शैक्षणिक व उद्यमी संघटनेची शनिवार दि. ७ रोजी दुपारी ४ वाजता भगवती हायस्कुल सभागृह, दुसरा मजला, सभा होणार आहे. राज्यातील ११ तालुक्यातील संयोजक या सभेस उपस्थित असणार आहेत.
राज्यातील भंडारी समाज, इतर समाज व सर्व धर्मातील तरुणांसाठी शैक्षणिक व उद्यमी
( उद्योग, एपींीशींशिपर्शींीहळ) विभागात सहाय्य करण्याच्या उद्देशाने या संघटनेची स्थापना करण्यात येत आहे. तरुणांना शैक्षणिक व उद्योगिक क्षेत्रात कार्यक्षेत्र निवडीसाठी मार्गदर्शन व बिनव्याजी कर्ज अशी संकल्पना तयार करून राबविण्याचे ठरले आहे, जेणेकरून सरकारच्या मदतीची वाट न पाहता, राज्यातील सर्व समाज स्वतःच्या च पुढाकारने, आत्मनिर्भर होऊन उन्नतिच्या दिशेने वाटचाल करू शकेल.
१) डॉ. नामदेव चोपडेकर, मुरगाव २) अशोक कोरगांवकर, सालसेत, ३) वैभव उल्हास नाईक, काणकोण ४) अॅड. अमर नाईक, सांगे, ५) अॅड. उत्कर्ष नाईक, केपे, ६) अॅड. मुकेश नावेलकर, डिचोली, ७) गोरखनाथ केरकर, तिसवाडी, ८) रमेश पोळजी व संजय बर्डे, बार्देश ९) हरिश्चंद्र नाईक, फोंडा, १०) दीपेश नाईक, धारबांदोडा व ११) शिवकुमार आरोलकर व भारत बागकर, पेडणे. सदर प्रतिनिधी सभेस मार्गदर्शन करतील.

-------------------------------

### मांद्रेत ८ रोजी काँग्रेसतर्फे जनता दरबार, मतदारांना न्याय देण्याचा प्रयत्न

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ६ :** मांद्रे गट काँग्रेस समितीतर्फे पेडणे व मांद्रे मतदारसंघातील मतदारांच्या समस्या ऐकण्यासाठी,जनता दरबार, रविवार दि. ८ रोजी दुपारी ४ वाजता मांद्रे जिल्हा पंचायत सभागृहात आयोजित केल्याची माहिती गट अध्यक्ष नारायण रेडकर यांनी दिली. या बैठकीला काँग्रेस पक्षाचे आमदार तथा विरोधी पक्षनेते युरी आलेमाव, हळदोणा आमदार कार्लस परेरा,आमदार एल्टन डिस्कोस्टा, पक्षाचे अध्यक्ष अमित पाटकर,जिल्हा व राज्य काँग्रेसचे पदाधिकारी तसेच अन्य समितीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.
दरम्यान, पेडणे तालुक्यात मोपा विमानतळ समस्या, ब्ल्यू कॅप टॅक्सी, भूमिहीन मदत, तुये इस्पितळ, इलेक्ट्रॉनिक सिटी, सीआरझेड विषय, रस्ता रुंदीकरण, टॅक्सी अॅप, बेरोजगार, पाणी, मांद्रे ९९ व्हिला, बाऊन्सर समस्या आदी बाबतीत जनता पिचलेली आहे.
आगामी पावसाळी अधिवेशनात मांद्रे व पेडणेतील समस्या सरकार दरबारी तसेच विधानसभेत मांडून, त्रासलेल्या मतदारांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे,असे रेडकर यांनी सांगितले. तरी मांद्रे व पेडणे मतदारसंघातील सरपंच,पंच, मतदार व नागरिकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष रेडकर यांनी केले आहे.

# १० कोटींच्या अॅम्बरग्रीससह तीन आरोपी अटकेत

**चार दिवसांची कोठडी | सौदा सुरू असतानाच सांगे पोलिसांनी घातली झडप : रॅकेट कार्यरत असल्याचा पोलिसांना संशय**

■ गौरेश सत्तरकर
टीम दैनिक हेराल्ड




**सांगे, दि. ६ :** सांगे पोलिसांनी दाभामळ येथील पेप्सी कंपनीजवळ काल संध्याकाळी ५.७५ किलो अॅम्बरग्रीस (व्हेल माशाची उलटी) बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी आणल्याप्रकरणी तीन जणांना अटक केली आहे. जप्त केलेल्या अॅम्बरग्रीस बाजारभाव सुमारे १० कोटी रुपये आहे. या प्रकरणी आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

अटक झालेल्यांमध्ये साईनाथ शेट (फोंडा), रत्नकांत कारापूरकर (वास्को) आणि योगेश रेडकर (सिधुदुर्ग) यांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, हे तिघे स्थानिक नसून बेकायदेशीर व्यवहारासाठी खास करून या भागात आले होते. अॅम्बरग्रीस हा परफ्यूम उद्योगात वापरला जाणारा दुर्मिळ आणि महत्त्वाचा पदार्थ असून वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत त्याचा व्यापार परवानगीशिवाय करणे बेकायदेशीर आहे.

साईनाथ शेट हा ड्रायव्हर असून, योगेश रेडकर व्यवसायिक आहे. तर रत्नकांत कारापूरकर हे निवृत्त सरकारी कर्मचारी असून सध्या दाभामळ येथील एका मत्स्यप्रक्रिया कंपनीत ड्राफ्ट्समन म्हणून कार्यरत आहेत. पोलिसांच्या मते, कारापूरकर यांनी या व्यवहाराचे नियोजन केले असून, त्यांनी दुर्गम आणि गर्दी नसलेल्या जागेची निवड केली होती.

सांगेचे आमदार सुभाष फळदेसाई यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया व्यक्त करत सांगितले की, आरोपी स्थानिक नाहीत, ते फक्त बेकायदेशीर कृत्यासाठी येथे आले होते. मी पोलिसांना कठोर कारवाई करण्याचे आणि सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

या भागात एका मत्स्यप्रक्रिया कंपनीचे अस्तित्व असून ती समुद्रकिनाऱ्यापासून दूर आहे. त्यामुळे या व्यवहारासाठी ती सामान्यतः वापरली जाणारी जागा नाही. या घटनेवरून एका मोठ्या रॅकेटच्या अस्तित्वाची शक्यता व्यक्त केली जात आहे, जे कदाचित माशांच्या व्यापारास आश्रय देत असावे, अशी पोलिस आणि स्थानिकांमध्ये चर्चा आहे.

वकील अमर नाईक यांनी या कारवाईचे कौतुक करत सांगितले की, १० कोटींच्या म्बरग्रीस जप्तीची ही एक मोठी कामगिरी आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर व्यवहार होत असल्याचे दिसून येते. परिसरातील या व्यवहारामागे खोलवरचा नेटवर्क असण्याची शक्यता आहे. यासाठी सखोल तपास आवश्यक आहे.

गुरुवारी सायंकाळी दाभामळ येथील पेप्सी फॅक्टरीजवळ हे तिघे अॅम्बरग्रीसची उलटी विक्रीसाठी आले होते. पोलिसांना ही माहिती मिळताच त्यांनी ताबडतोब सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. पोलिसांनी जप्त केलेली ५.७५ किलो उलटी उच्च प्रतीची असून ती परफ्यूम बनविण्यासाठी वापरली जाते. संशयितांमध्ये दोन गोव्याचे रहिवासी असून एक परराज्यातील असूनही तो देखील गोव्यात वास्तव्य करणारा आहे.

सांगे पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून तस्करीचे नेटवर्क उघड करण्यासाठी पुढील तपास सुरु आहे, असे पोलिस निरीक्षक दितेंद्र नाईक यांनी सांगितले.

स्पर्म व्हेल हा सीआयटीइएस अंतर्गत संरक्षणाधीन प्राणी आहे, त्यामुळे त्याची शिकार किंवा त्याच्या उलटीचा अवैध वापर यावर बंदी आहे. मात्र, किनाऱ्यावर नैसर्गिकरित्या सापडणाऱ्या म्बरग्रीसचे संवर्धन आणि शाश्वत वापर सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे.या उलटीमध्ये असलेल्या न पचलेल्या म्हाकुळाच्या दातासारख्या कडक भागांमुळे ती सहज ओळखता येते. उलटीस लाटांवर तरंगताना नैसर्गिक प्रक्रियेद्वारे ती मेणासारखी बनते आणि किनाऱ्याला वाहून येते. यामुळे म्बरग्रीसचे आढळणे केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर पर्यावरणीय, औषधीय व सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वपूर्ण ठरते. स्थानिक प्रशासनाने याचे संरक्षण, निगराणी व कायदेशीर वापर सुनिश्चित करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे गरजेचे आहे.

### अॅम्बरग्रीस किमती का आहे ?

**कोकण आणि गोव्याच्या किनाऱ्यांवर काही काळापासून आढळणाऱ्या स्पर्म व्हेलच्या उलटीला, ज्याला अॅम्बरग्रीस म्हणतात, मोठा आर्थिक आणि औद्योगिक महत्त्व प्राप्त झाले आहे. व्हेल मासा हा खोल समुद्रात राहणारा आणि संरक्षित प्राणी असून त्याच्या शरीरातून निघणारा हा काळपट रंगाचा ज्वलनशील पदार्थ नैसर्गिक सुगंध उद्योगात अनमोल समजला जातो. अॅम्बरग्रीस हा मुख्यतः अत्तर, अगरबत्ती आणि धूप उत्पादनांमध्ये वापरला जातो. अत्तरात तो फिक्सेटीव्ह म्हणजेच स्थिरीकरण द्रव्य म्हणून काम करतो, ज्यामुळे सुगंध शरीरावर किंवा कपड्यावर दीर्घकाळ टिकतो. बाजारात अॅम्बरग्रीसपासून तयार केलेले अत्तर कोट्यवधी रुपयांत विकले जाते . केमिकल फिक्सेटीव्हच्या तुलनेत हा नैसर्गिक पदार्थ मानवी शरीरावर हानिकारक परिणाम करत नाही, म्हणून त्याची मागणी अधिक आहे.तसेच, अॅम्बरग्रीसचा वापर औषधांतही होतो, ज्यामुळे तो केवळ सुगंध उद्योगापुरता मर्यादित नाही तर औषधशास्त्रातही महत्त्वाचा घटक ठरतो.**

## निष्काळजी पर्यटकांवर कडक कारवाईचा निर्णय

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ६ :** गांजे नदीत आंघोळीसाठी उतरलेल्या दोन युवकांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर उसगाव गांजे पंचायतीने गंभीर दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर फोंडा पोलीस निरीक्षक विजयनाथ कवळेकर यांच्या उपस्थितीत पंचायत कार्यालयात एक महत्वाची बैठक झाली. या बैठकीत पावसाळ्यात नदीत स्नान किंवा पिकनिकसाठी येणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यासाठी पोलिस, पंचायत आणि स्थानिक नागरिकांनी सहकार्य करून दक्षता घेण्याचा निर्णय घेतला.

दक्षिण गोवा जिल्हाधिकारी यांनी पावसाळी मोसमात जलकुंभात स्नान करण्यावर आधीच मनाईचा आदेश जारी केला आहे. गावात वारंवार होणाऱ्या बुडून मृत्यूंमुळे उसगावमधील नागरिक संतप्त झाले असून, गावाची वाईट प्रसिद्धी होत असल्याने बुडून होणाऱ्या घटनांना रोखण्यासाठी खबरदारीचे उपाय करण्यात येत आहेत.

सरपंच रमनाथ डांगी यांनी बैठकीनंतर सांगितले की, नदीकाठी धोकादायक ठिकाणी चेतावणीचे फलक लावण्यात येणार आहेत. याशिवाय नदीत स्नान करण्यावर कडक निर्बंध घालण्यात येणार असून, पिकनिकसाठी येणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात येईल. पंचायत सदस्यांसह पोलीस कर्मचारी आणि स्थानिक नागरिकही नदीत प्रवेश करणाऱ्यांवर नजर ठेवतील आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती देतील. गांजे धरणाखालील भाग विशेषतः धोकादायक असल्याने येथे येणाऱ्या पर्यटकांमध्ये बुडून मृत्यूंच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

सरपंच डांगी यांनी पुढे सांगितले की, या महिन्याच्या १ जून रोजी फोंडा येथील साई स्पोर्ट्स अथॉरिटीज परिसरात दोन तरुण बुडले होते, परंतु स्थानिकांनी त्यांना वाचवले. याचप्रमाणे, मार्च महिन्यात होळीच्या सणाच्या निमित्ताने खडपणबांध फोंडा भागात दोन युवक बुडले होते, जे कर्नाटकचे रहिवासी होते. या घटनांच्या आधारे पंचायतीने नदीत स्नान करण्यास पूर्णपणे बंदी घालण्याची गरज व्यक्त केली असून, नियम मोडणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. भविष्यात अशा दुर्दैवी घटनांचा पुनरावृत्ती होऊ नये यासाठी पंचायत आणि पोलिस अधिक सजग राहतील, असेही बैठकीत ठरले आहे.

## मडगाव मासळी बाजाराबाहेर बेकायदेशीर विक्री सुरूच

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ६ :** मडगाव घाऊक मासळी बाजाराबाहेरील परिसरात सुरू असलेल्या अनियंत्रित आणि बेकायदेशीर किरकोळ मासे विक्रीमुळे नागरिक आणि प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. नियमांनुसार बंदी असलेल्या या विक्रीमुळे केवळ कायदेशीर अडचणी निर्माण होत नाहीत तर वाहतूक कोंडीसह स्थानिक शांततेतही मोठा अडथळा निर्माण होत आहे.

मडगाव नगरपरिषदेच्या (एमएमसी) हद्दीत असलेल्या या भागात रस्त्याच्या कडेला अनेक विक्रेते बिनधास्त स्टॉल लावून मासे आणि इतर वस्तू विक्रीसाठी गर्दी करत आहेत. असंख्य तक्रारी असूनही एमएमसीकडून याबाबत प्रभावी कारवाई झालेली नाही.

विशेष बाब म्हणजे, या क्षेत्रातील सोपो (बाजार शुल्क) वसुली संदर्भातही गंभीर गैरसोय जाणवते. दक्षिण गोवा नियोजन व विकास प्राधिकरणाने (एसजीपीडीए) सोपो निविदा जाहीर न करता विक्रेत्यांकडून शुल्क वसूल करत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. अधिकृत पावत्यांशिवाय वसुली होत असल्यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिक रहिवासी रेमेडियस फर्नांडिस म्हणतात की, घाऊक बाजाराबाहेरील किरकोळ विक्रीवर बंदी असताना ही परिस्थिती स्वीकारार्ह नाही. नियमांचे उल्लंघन करून विक्रेते ही विक्री करत आहेत आणि अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहेत. व्यवस्थित नियमन न झाल्यामुळे परिस्थिती गंभीर झाली आहे.

**सोपो निविदा अद्याप प्रलंबित**

सेड्रिक परेरा यांचे म्हणणे आहे की, एसजीपीडीए पावत्या न देता सोपो वसूल करत आहे, आणि तेही निविदा प्रक्रिया न पाळता. ही भूमिका कायदेशीर नाही. एमएमसीने यावर तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. स्थानिक लोक या निष्काळजीपणामुळे त्रस्त आहेत.

दैनंदिन प्रवासी कृष्णा नाईक यांनी म्हटले, या बेकायदेशीर विक्रीमुळे वाहतुकीला मोठा फटका बसतो. शाळा बस, रुग्णवाहिका आणि कार्यालयात जाणाऱ्या लोकांना सतत कोंडीचा सामना करावा लागतो. अधिकारी मात्र याकडे दुर्लक्ष करत आहेत, हे दुःखद आहे.

अनेक तक्रारी असूनही, मडगाव नगरपरिषद आणि एसजीपीडीएकडून अजूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे स्थानिक लोकांत संताप वाढत आहे. रहिवासी आता तातडीने योग्य नियमन करून घाऊक मासळी बाजाराबाहेरील बेकायदेशीर किरकोळ विक्रीवर बंदी घालण्याची, तसेच पारदर्शक आणि अधिकृत मार्गाने सोपो निविदा प्रक्रिया त्वरित राबवण्याची मागणी करत आहेत.

## होली स्पिरिट फेस्तसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जाहीर

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ६ :** येत्या ८ जून रोजी होणाऱ्या होली स्पिरिट चर्चच्या वार्षिक मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर, दक्षिण गोव्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाने सार्वजनिक सुरक्षेसह वाहतूक आणि स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

ही तत्त्वे मडगावमधील फेस्त मेळाव्याचे नियोजन अधिक शिस्तबद्ध आणि सुरक्षित करण्यासाठी जाहीर करण्यात आली असून, यामध्ये उच्च न्यायालयाच्या २०१५ मधील आदेशांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचनाही समाविष्ट आहेत. ग्रीन गोवा फाउंडेशनने दाखल केलेल्या याचिकेनंतर न्यायालयाने हे आदेश जारी केले होते.

उपजिल्हाधिकारी एव्हेलिना डीएसए ई. परेरा यांनी मडगाव नगर परिषद आणि दक्षिण गोवा नियोजन व विकास प्राधिकरण यांना १३ ऑक्टोबर २०१५ रोजीच्या उच्च न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे आदेश दिले आहेत.

**वाहतूक, स्वच्छता आणि सुरक्षेवर भर**

**प्रमुख मार्गदर्शक सूचना**

१. प्रमुख रस्त्यांवर स्टॉल्स बंदी : पणजी-मडगाव मुख्य मार्ग, ओल्ड मार्केट सर्कलकडे जाणारा मार्ग, फोंडा आणि शहराच्या दक्षिणेकडील बाजूकडील रस्त्यांवर कोणतेही स्टॉल्स, तात्पुरती बांधकामे किंवा किऑस्क उभारण्यास मनाई करण्यात आली आहे. वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यात येणार आहे.

२. कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता मोहिम : संपूर्ण उत्सवकाळात व्यापक कचरा व्यवस्थापन योजना राबवण्याच्या सूचना दिल्या असून, नियमित स्वच्छता मोहीम राबवणे बंधनकारक असेल.

३. पार्किंग आणि वाहतूक नियंत्रण : नियोजनबद्ध आणि नियंत्रित पार्किंग झोन तयार करण्यात येणार आहेत. वाहनांची वर्दळ सुरळीत राहावी यासाठी विशेष नियोजन केले जाणार आहे.

४. गर्दी नियंत्रणासाठी पोलिस बंदोबस्त : गर्दी नियंत्रणासाठी पुरेशा प्रमाणात पोलिस दल तैनात करण्यात येणार आहे, तर कायद्याचे उल्लंघन रोखण्यासाठीही कडक पावले उचलली जातील.

५. आपत्कालीन सेवा सज्ज : आरोग्य आणि अग्निसुरक्षा यंत्रणा सज्ज ठेवण्याचे आदेश दिले गेले असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी तयार राहण्यावर भर देण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले की ही मार्गदर्शक तत्त्वे केवळ कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक नाहीत, तर वार्षिक मेळाव्याच्या यशस्वी, सुरक्षित आणि निर्बंधमुक्त आयोजनासाठी आवश्यक आहेत. या फेस्टिव्हलमध्ये दरवर्षी हजारो श्रद्धाळू आणि पर्यटक मडगावमध्ये उपस्थित राहतात, त्यामुळे शहराच्या नागरी व्यवस्थापनाला ताण न येण्यासाठी ही खबरदारी घेण्यात आली आहे.

## आरसीबी व आयोजकांवर गुन्हा दाखल चार जण अटकेत

**वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई :उच्च न्यायालयाने घेतली दखल**

**बंगळुरू, दि. ६ :**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) च्या आयपीएल विजयाच्या मिरवणुकीदरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये ११ नागरिकांचा मृत्यू आणि ३३ जणांच्या दुखापतीनंतर उशिरा का होईना पण राज्य सरकार आणि पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत.

बंगळुरू पोलिसांनी या प्रकरणी आरसीबी व्यवस्थापनातील निखिल सोसाळे, डीएनए इव्हेंट मॅनेजमेंटचे सुनील मॅथ्यू आणि किरण कुमार तसेच आरसीबीशी संबंधित सुमंत यांना अटक केली आहे. हे अधिकारी शहर सोडण्याच्या तयारीत असताना त्यांना विमानतळावर ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी याप्रकरणी आणखी अटकांची शक्यता वर्तवली आहे.

एफआयआर दाखल झाल्यानंतर आणि कर्नाटक सरकारने आरसीबी, कर्नाटक क्रिकेट असोसिएशन (केएससीए) आणि कार्यक्रम आयोजित करणाऱ्या डीएनए इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीविरोधात कठोर कारवाई करण्याचा आदेश दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी बुधवारीच यासंदर्भात कठोर भूमिका घेत सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचे संकेत दिले होते. त्यानुसार गुरुवारी (५ जून) रात्री बेंगळुरूचे पोलीस आयुक्त बी. दयानंद, अतिरिक्त पोलिस आयुक्त विकास कुमार, डीसीपी शेखर एच.टी. आणि एसीपी बालकृष्ण यांना निलंबित करण्यात आले आहे. याशिवाय, सीमांत कुमार सिंह यांची बेंगळुरूचे नवे पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी शुक्रवारी पदभार स्वीकारला.

मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ही चेंगराचेंगरी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळेच घडली असून, मृतांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून प्रशासनाने ती पूर्णपणे टाळू शकली असती. आयपीएल विजयानंतर १८ वर्षांनी आरसीबीने ट्रॉफी उचलल्याच्या उत्साहात सोशल मीडियावर मिरवणुकीची घोषणा करण्यात आली होती. या घोषणेनुसार विधानसभेपासून केएससीए स्टेडियमपर्यंत मिरवणूक निघणार होती, आणि प्रेक्षकांना मोफत पास देण्यात येतील, असे आरसीबीच्या अधिकृत हँडलवरून जाहीर करण्यात आले होते. यामुळे हजारो लोक स्टेडियम आणि आजूबाजूच्या परिसरात एकत्र झाले आणि अचानक झालेल्या गर्दीत चेंगराचेंगरी झाली.

बंगळुरूचे नवे पोलिस आयुक्त सीमांत कुमार सिंह यांनी एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, आम्ही घटनास्थळी तपासासाठी पथके तयार केली आहेत. काहींना अटक करण्यात आली आहे आणि प्रकरण आता सीआयडीकडे सोपवले जाईल. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांबद्दल शोक व्यक्त करत पुन्हा अशी घटना होऊ नये म्हणून कठोर उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या घटनेची गंभीर दखल घेत कर्नाटक उच्च न्यायालयानेही स्वतःहून याची नोंद घेत राज्य सरकारला नोटीस बजावली आहे. कामेश्वर राव आणि सी.एम. जोशी यांच्या खंडपीठाने सरकारकडे १० जूनपर्यंत परिस्थितीचा सविस्तर अहवाल मागवला आहे. न्यायालयाने विचारले आहे की, भविष्यकाळात अशी आपत्ती टाळण्यासाठी निश्चित कार्यपद्धती (ड्जझ) तयार केली जाणार आहे का. सरकारच्या वतीने उपस्थित राहिलेल्या महाधिवक्त्यांनी माहिती दिली की, चेंगराचेंगरीच्या वेळी स्टेडियममध्ये भरगच्च गर्दी होती आणि अंदाजे २ लाख लोक आजूबाजूच्या परिसरात जमले होते. या गंभीर प्रकरणात न्यायालयीन


